# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 30/04/2016 (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शनिवार दिनांक 30 एप्रिल 2016 रोजी (का.प.क्र .16) मा.सभापती श्री.दिलीप गंगाधर थोरात यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 03-00 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली.सभेला उपआयुक्त (प्र.), नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
02. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
03. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
04. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
05. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
06. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
07. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
08. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
09. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
10. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
11. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
12. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
13. स.स.श्रीमती रेश्मा अशफाक कुरैशी

**विषय क्र. 61 :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20 (3) व 20 (4) अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य चिठ्ठ्या टाकुन (ड्रॉ पध्दतीने) निवृत्त करणे.

मा.सभापती : विषय क्र.59 ऐवजी विषय क्र.61 असा वाचण्यात यावा,दुरूस्तीसह मंजुर.

**नगर सचिव :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20 (3) व 20 (4) अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य चिठ्ठ्या टाकुन (ड्रॉ पध्दतीने) निवृत्त करणे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20 (2) अन्वये महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकानंतर दिनांक 30/5/2015 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी 16 (सोळा) सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणुन नेमणुक झालेली आहे.

पोट कलम 3 अन्वये स्थायी समितीच्या 16 सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम 2 मध्ये उल्लेख केलेले महानगरपालिकेची सभा ज्या महिन्यात भरेल, त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील. स्थायी समिती सदस्य निवडीची महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दिनांक 30/05/2015 रोजी संपन्न झाली होती. त्यामुळे दिनांक 01/05/2016 रोजी मध्यान्हानंतर निम्मे सदस्य निवृत्त होतील. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20 चे पोट कलम (4) मधील तरतुदीप्रमाणे पोट कलम (2) अन्वये निवडून आल्या नंतर 1 वर्षाने पोट कलम (3) अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील, ते पोट कलम (3) मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपूर्वी मा.स्थायी समितीचे सभापती ठरवतील, अशावेळी व अशा रितीने चिठ्ठ्या टाकुन ठरविण्यात येईल आणि त्यांनतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळापर्यंत असतील,ते निवृत्त होतील.

विद्यमान 16 स्थायी समिती सदस्यांच्या नावाच्या स्वतंत्र चिठ्ठ्या तयार करण्यांत आलेल्या आहेत. या 16 (सोळा) चिठ्ठ्या स्वतंत्र पारदर्शक बरणीत टाकण्यांत येतील. व त्यातुन एक-एक चिठ्ठी काढुन अशा ज्या आठ चिठ्ठ्या ज्यांच्या नावाच्या निघतील ते सदस्य निवृत्त होतील.

स्थायी समितीचे 8 सदस्य निवृत्त होण्यासाठी वर दर्शविल्याप्रमाणे 16 (सोळा) सदस्यांच्या नावांच्या स्वतंत्र चिठ्ठ्या मा.सभापती, स्थायी समिती बरणीमध्ये टाकतील. चिठ्ठ्या टाकतांना त्या सर्वांना दाखविण्यात येतील व बंद पाकीटात टाकुन त्याला एकाच रंगाचे रबर बँड लावुन त्या सर्वांसमक्ष बरणीत टाकण्यात येतील आणि सरमिसळ करून एक-एक अशा आठ नांवाच्या चिठ्ठ्या काढण्यात येतील. ज्यांच्या नांवाची चिठ्ठी निघेल, तो स.सदस्य निवृत्त होईल, असे समजण्यात येईल.

**(यावेळी नगरसचिव हे 16 स्वतंत्र चिठ्ठ्या मा.सभापती,स्थायी समिती यांचेकडे देतात व मा.सभापती,स्थायी समिती या चिठ्ठ्यावरील नांवे वाचुन दाखवितात व नावाच्या चिठ्ठ्या सर्वांना दाखवितात.) व विचारतात की, सर्व स.सदस्य समाधानी आहेत का? यावर सर्व स.सदस्य होकार देतात.**

**नगर सचिव :**

विद्यमान स्थायी समिती सदस्यांच्या नावाच्या एकुण 16 चिठ्ठ्या तयार करण्यात आलेल्या असून मा.सभापती,स्थायी समिती यांनी नांवे वाचुन दाखवली व नांवे असलेल्या चिठ्ठ्या सभागृहात दाखवल्या आहेत. याबद्दल कुणाचा काही आक्षेप असेल तर तसे सुचवावे.

मा.सभापती,स्थायी समिती यांनी चिठ्ठ्या असलेल्या पाकीटांची गुंडाळी करून एकाच रंगाचे रबर बँड लावण्यात आल्याचे सभागृहास दाखवतील. यानंतर 16 चिठ्ठ्या असल्याबाबत एक-एक मोजणी करून सर्वांसमक्ष पारदर्शक बरणीत टाकतील. बरणीत 16 चिठ्ठ्या टाकुन बरणी बंद करून सर्वांना दाखविण्यात येईल. पारदर्शक बरणी हलवुन चिठ्ठ्यांची सरमिसळ करण्यात येईल. नंतर या पारदर्शक बरणीतील 16 चिठ्ठ्या दुसऱ्या एका कपडा लावलेल्या बंद बरणीत टाकुन त्यास हलवुन पुन्हा सरमिसळ करण्यांत येईल.

(यावेळी आतापर्यंत झालेल्या कामकाजा विषयी कुणाचा आक्षेप आहे का, विचारणा केली जाते.)

(यावेळी सभागृहातील उपस्थित सर्व सदस्य आमचा काहीही आक्षेप नाही, असे सांगतात.)

**नगर सचिव :**

या चिठ्ठ्या कपडा बांधलेल्या रिकाम्या बरणीत टाकण्यात येतील त्यानंतर सरमिसळ करून मा.सभापती एक-एक चिठ्ठी काढतील, ज्या ज्या स.सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठ्या निघतील ते स.सदस्य निवृत्त होतील.

**मा.सभापती :**

16 नावे असलेल्या स्वंतत्र चिठ्ठ्या बंद बरणीत टाकण्यात आलेल्या आहेत. आता ज्या आठ चिठ्ठ्या काढण्यात येतील ते आठ सदस्य स्थायी समिती सदस्य पदावरून निवृत्त होतील.

मा.सभापती हे बंद बरणीतुन एक-एक अशा आठ स्वतंत्र नांवे असलेल्या चिठ्ठ्या काढतील.

यावेळी मा.सभापती-स्थायी समिती यांनी बंद बरणीचे झाकण उघडुन एक-एक चिठ्ठी काढली.

**नगर सचिव :**

एकुण 16 सदस्यांच्या बंद बरणीत चिठ्ठ्या टाकुन त्यातुन मा.सभापती यांनी 8 (आठ) स.सदस्यांच्या चिठ्ठ्या काढल्या त्यात खालील 8 (आठ) स.सदस्यांची नांवे निघाली. ती पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | चिठ्ठ्या निघालेल्या आठ स्थायी समिती सदस्यांची नांवे |
|---|---|
| 01 | रेश्मा अशफाक कुरैशी |
| 02 | कमल रामचंद्र नरोटे |
| 03 | खान इरशाद इब्राहीम |
| 04 | ज्योती राजाराम मोरे |
| 05 | नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| 06 | गजानन रामकिशन बारवाल |

| | |
|---|---|
| 07 | दिलीप गंगाधर थोरात |
| 08 | ज्योती सुभाष पिंजरकर |

वरील 8 (आठ) स्थायी समिती सदस्य, हे दिनांक 01/05/2016 रोजी दुपारनंतर स्थायी समिती सदस्य पदावरून निवृत्त होत आहेत.

**ठराव :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20 (3) व 20 (4) अन्वये सभागृहात चिठ्ठ्या टाकुन (ड्रॉ पध्दतीने) स्थायी समितीचे खालीलप्रमाणे आठ (08) स.सदस्य निवृत्त झालेले आहेत. त्यास मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | निवृत्त झालेल्या आठ स्थायी समिती सदस्यांची नांवे |
|---|---|
| 01 | रेश्मा अशफाक कुरैशी |
| 02 | कमल रामचंद्र नरोटे |
| 03 | खान इरशाद इब्राहीम |
| 04 | ज्योती राजाराम मोरे |
| 05 | नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| 06 | गजानन रामकिशन बारवाल |
| 07 | दिलीप गंगाधर थोरात |
| 08 | ज्योती सुभाष पिंजरकर |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.62 :**

दिनांक 29/09/2015 (दि.28/09/15 ची तहकुब का.प.क्र.08),दि.05/11/2015 (का.प.क्र.09), दि.04/12/2015(दि.05/11/2015 ची तहकुब का.प.क्र.09), दि.04/12/2015 (का.प.क्र.10), 21/12/2015 (का.प.क्र.11),20/01/2016 (का.प.क्र.12),दि.18/02/2016(का.प.क्र.13),दि.16/03/2016(का.प.क्र.14), दि.19/03/2016 (16/03/16 ची तहकुब का.प.क्र.14), दि.28/03/2016(दि.19/03/16 ची तहकुब का.प.क्र.14),दि.30/04/2016 (का.प.क्र.15) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.सभापती : मागील झालेल्या सर्व सभांचे व आज संपन्न होत असलेल्या सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

दिनांक 29/09/2015 (दि.28/09/15 ची तहकुब का.प.क्र.08), दि.05/11/2015 (का.प.क्र.09), दि.04/12/2015(दि.05/11/2015 ची तहकुब का.प.क्र.09),दि.04/12/2015 (का.प.क्र.10दि.21/12/2015 (का.प.क्र.11),दि.20/01/2016(का.प.क्र.12),दि18/02/2016(का.प.क्र.13),दि16/03/2016(का.प.क्र.14), दि.19/03/2016(16/03/16 तहकुब का.प.क्र.14),दि.28/03/2016 (दि.19/03/16 ची तहकुब का.प.क्र.14), दि.30/04/2016 (का.प.क्र.15) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस मंजुरी देण्यांत येते तसेच आज दिनांक 30/04/2016 रोजी (का.प.क्र.16) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत स्विकृतीसह कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच सभा राष्ट्रगिताने संपल्याचे मा.सभापती स्थायी समिती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद